**निशाणी क्र. २४ वर**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी.

देवाची शपथ खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | शाहरुख खान सलीम खान, |
| माझे वय | – | २८ वर्षे, |
| धंदा | – | शेती, |
| राहणार | – | निमगांव, ता. नांदुरा, जि. बुलडाणा. |

– – – – –

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.बी.व्ही.वाहूरवाघ यांच्यामार्फत</u>**

मी आरोपींना ओळखतो. घटना ही दोन वर्षापुर्वी लाक डॉऊन चालु असतांना घडली होती. मी माझ्या भावासाठी गोळ्या आणण्यासाठी साईनाथ मेडिकल येथे गेलो होतो. मी गोळ्या घेवुन निघालो असता तेथे दोन्ही आरोपी होते व त्यातील आरोपी गणेश माळोदेने मला काठीने उजव्या हातावर आणि पाठीवर मारले. घटनास्थळी साईनाथ मेडिकलचे मालक आणि माझा मित्र उस्मान शहा हजर होते. घटनेचा रिपोर्ट मी दिला होता. आता मला तो रिपोर्ट दाखविला त्यावर माझी सही आहे. मजकुर बरोबर असुन त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येते. छापील खबरीस **निशाणी क्र. २६** देण्यात येते. पोलीसांनी मला उपचारासाठी दवाखान्यात घेवुन गेलो होते. पोलीसांनी माझी चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता. घटनेतील काठी दाखविल्यास मी ती ओळखु शकतो ती चार फुट लांबीची बांबुची काठी होती. आजरोजी एक आरोपी न्यायालयात हजर आहे. त्याला मी ओळखतो.

**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे वकील श्री. पी.एस. मु–हे यांच्यामार्फत**

०२. हे म्हणणे खरे आहे की, साईनाथ मेडिकलच्या दोन्ही बाजुने दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी सायकल वर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझी सायकल उभी करुन मेडिकल दुकानात औषधे घेण्यासाठी गेलो होतो. आरोपी अचानक आले व मला मारण्यास सुरुवात केली त्यामुळे मी मलकापुरच्या दिशेने पळत सुटलो. त्यावेळी स्टेट बँक पर्यंत जावुन दळवी पुरा मध्ये पोहोचलो. माझा पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे मला चालता येते नव्हते, त्यामुळे मी माझ्या भाऊ मोहसीन याला फोन केला होता. तेथे माझा भाऊ मोहसीन एकटा आला व मला घरी घेवुन गेला. हे म्हणणे खरे नाही की, साईनाथ मेडिकलच्या बाजुला ट्रॅफीक पोलीस चौकी आहे.  हे म्हणणे खरे नाही की, तेथे ट्रॅफीक नियंत्रण करण्यासाठी नेहमी पोलीस असतात. हे म्हणणे खरे नाही की, तेथून दहा ते पंधरा मिनिटे अंतरावर नांदुरा पोलीस ठाणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, साईनाथ मेडिकल पासून नांदुरा पोलीस ठाण्यात जाण्यासाठी पंधरा ते विस मिनीटे लागतात.

०३. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर मी घटनेबाबत मोहसीनला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर मी सरळ घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर मी दुस–या दिवशी दुपारी ०२.०० वाजता घटनेबाबत रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या दिवशी ०२.०० वाजे पर्यंत माझे दैनंदिन कामे करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या दिवशी ०२.०० वाजे पर्यंत मी घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गणेश माळोदे हा नांदु–याचा रहिवाशी असुन मी त्याला घटनेच्या पुर्वी कधीही पाहिले

नव्हते. मला त्याच्या नावाबदल माहित नव्हते. घटनेनंतर मी पोलीस ठाण्यात एकदा ही गेलो नव्हतो.

०४. हे म्हणणे खरे आहे की, नांदु–यातील दुकाने रात्री १०.०० ते ११.०० वाजे पर्यंत चालु असतात. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे महामार्गावर असल्यामुळे तेथे नेहमी गर्दी असते. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, लॉक डाऊन असल्यामुळे घटनास्थळी कोणीही नव्हते.

०५. तपासादरम्यान मी औषधे लिहुन दिलेली डॉक्टरांची चिठ्ठी पोलीसांना दाखविली होती. परंतु, ती पोलीसांनी जप्त केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, उस्मान शहा हा निमगांव येथे राहतो. तो माझ्या ओळखीचा असुन तो शेती करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गणेशने मला मारले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावरुन पळत गेल्यामुळे मला हातावर व पाठीवर जखमा झाल्या होत्या. आरोपी व माझ्यामध्ये भांडण नव्हते व नाही. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही आरोपी घटनास्थळावर आले व मला मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे वकील श्री. जी.ई. निमकर्डे यांच्यामार्फत**

०६ पुढील उलटतपास **निशाणी क्र. २७** वर केलेल्या आदेशाप्रमाणे पुढील तारखे पर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/–
**(आर.ए. मिसाळ)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – २४/०८/२०२२.